म. ग्रं. सं. ठाणें

| | |
|---|---|
| विषय | किरकोळ |
| संग्रहालय क्रमांक | ३६ |
| लेखक | ३०६ |
| सन | १८६८ |
| पुस्तकाचें नांव | शाळेतील मुलांकरितां दुसरे पुस्तक |


म. ग्रं. सं. ठाणें
विषय किरकोळ
सं. नं. ३०६


किरकोळ ३६

BOMBAY:
PRINTED AT THE "ORIENTAL PRESS.

शाळांतिल मुलांकरिता

# दुसरें पुस्तक.

मेहरबान दैरेक्तर आफ् पब्लिक् इनस्त्रक्शन.

ह्यांच्या हुकुमावरून

मराठी त्रान्सलेतर

व

त्यांच्या हाताखालची मंडळी ह्यांनीं केलें;

तें तपासून शुद्ध केलें.

आवृत्ति सातवी.

(हें पुस्तक इ० स० १८६७ चा आक्त २५ प्रमाणें रजिस्तर केलें असे.)

मुंबई:

गवर्नमेन्त सेन्त्रल बुक दिपो.

सन १८६८.

शके १७९०.

किंमत दीड आणा.

*Published for the Educational Department.*

# RÁṬHÍ SECOND BOOK,

FOR THE USE OF

GOVERNMENT SCHOOLS

IN THE

BOMBAY PRESIDENCY.

BY THE

MARÁṬHÍ TRANSLATOR,

AND HIS ASSISTANTS.

Seventh Edition, Revised and Corrected.

---

REGISTERED UNDER GOVERNMENT OF INDIA'S
ACT XXV. OF 1867.

---

Bombay:
OV ERNMENT CENTRAL BOOK DEPOT.

---

1868.

*Price One and Half Anna.*

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

मुंबईमध्ये

[illegible]

"ओरिएन्तल" छापखान्यांत छापिलें.

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

# अनुक्रमणिका.


| धडे. | धड्याचें नांव. | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | कुत्रा आणि प्रतिबिंब | ११ |
| २ | अस्वल | १२ |
| ३ | वाक्यें | १३ |
| ४ | चांगला मुलगा | १३ |
| ५ | वेडा मुलगा | १४ |
| ६ | मधमाशांचें कृत्रिम घर | १५ |
| ७ | वाक्यें | १६ |
| ८ | धनगराचें पोर | १७ |
| ९ | तारे | १९ |
| १० | किड्यांविषयीं | २० |
| ११ | घारी | २१ |
| १२ | वाक्यें | २१ |
| १३ | म्हशी | २३ |
| १४ | सांबर | २४ |
| १५ | आगगाडी | २५ |
| १६ | मिसर देशांतील गाडी | २६ |
| १७ | वाक्यें | २७ |
| १८ | वारा, पाऊस | २८ |

| धडे. | धड्याचें नांव. | पृष्ठ. |
|---|---|---|
| १९ | सोनें, रूपें, तांबें | २९ |
| २० | तंबू | ३० |
| २१ | पारा, लोखंड, कथील | ३१ |
| २२ | वाक्यें | ३१ |
| २३ | शहाणा व द्वाड | ३३ |
| २४ | आमबोट | ३४ |
| २५ | थोरपणा आणि उपकार | ३६ |
| २६ | सूर्य, दिवसाचे विभाग आणि काळ | ३६ |
| २७ | उंट | ३७ |
| २८ | मेंढरूं | ३९ |
| २९ | वाक्यें | ४० |
| ३० | वाक्यें | ४१ |
| ३१ | ससा | ४२ |
| ३२ | खार | ४३ |
| ३३ | बहिणभावांची प्रीति—अभंग | ४५ |
| ३४ | ह्या लोकचें कर्तव्यकर्म | ४६ |
| ३५ | घोडा | ४७ |
| ३६ | घोडा | ४८ |
| ३७ | मुलांचा स्वच्छपणा | ४९ |
| ३८ | सकाळ, संध्याकाळ आणि दिशा | ५० |

सं. १८८५

# अनुक्रमाणिका.


| धडे. | धड्याचें नांव. | पृष्ठ. |
|---|---|---|
| ३९ | चोर आणि कुत्रा | ५१ |
| ४० | कविता | ५२ |
| ४१ | गरुडपक्षीण, मांजरी, आणि डुकरी | ५४ |
| ४२ | म्हणी | ५७ |
| ४३ | जिराफ | ५८ |
| ४४ | कविता | ५९ |
| ४५ | गाय | ६० |
| ४६ | रबर | ६१ |
| ४७ | कांच | ६१ |
| ४८ | पोपट | ६३ |
| ४९ | कोंबडा | ६४ |
| ५० | सुसर | ६६ |
| ५१ | शहामृग | ६७ |
| ५२ | बुलबुल पक्षी आणि सोनकिडा. कविता | ६९ |
| ५३ | वाचणें | ७१ |

## शिक्षकास सूचना.

पहिल्या पुस्तकांत जे धडे आहेत ते मुलांस चांगले आले म्हणजे ह्या दुसऱ्या पुस्तकांतील धडे त्यांस शिकण्यास सोपे पडतील; म्हणून पहिलें पुस्तक ज्यास चांगलें शिकला आहे त्याला हें दुसरें पुस्तक शिकविण्यास शिक्षकानें आरंभ करावा.

शिक्षकानें मुलांच्या उच्चाराकडे व शुद्ध वाचण्याकडे फार लक्ष्य द्यावें. मुलांनीं वाचतांना घाई करूं नये, व अडखळत वाचूं नये, ह्याविषयीं शिक्षकानें जपावें.

मुलांनीं धडा वाचला म्हणजे त्यांतील शब्दांचा अर्थ मुलांस विचारावा, व ज्या शब्दांचा अर्थ मुलांस ठाऊक नसेल त्यांचा अर्थ त्यांस समजावून द्यावा.

कितीएक धड्यांवर नामें, सर्वनामें, विभक्ति लावून लिहिलीं आहेत, व कितीएक क्रियापदांचीं रूपें तिन्ही काळचीं लिहिलीं आहेत. ह्याचा मुख्य हेतु असा कीं, व्याकरणांत जे पारिभाषिक शब्द, नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, भूतकाळ, वर्तमानकाळ, भविष्यकाळ, इत्यादि आहेत, त्यांचीं नांवें घेतल्या-

वाचून मुलांस व्याकरणविषयसंबंधी थोडीबहुत माहितगारी व्हावी; म्हणून ते वर लिहिलेले शब्द मुलांकडून पाठ करवून पारिभाषिक शब्द न उच्चारितां त्यांसारखीं दुसरीं रूपें शिक्षकानें मुलांकडून करवावीं.

वाचण्याची गोडी मुलांस लागावी, व आपलें ज्ञान वाढवून घेण्याची हौस त्यांस अधिक यावी, म्हणून ह्या पुस्तकांत कांहीं मुलांच्या गोष्टी, व कांहीं जनावरांच्या गोष्टी, व कांहीं ईश्वरसृष्ट पदार्थांच्या गोष्टी, व कांहीं शहाणपणाच्या गोष्टी, व कांहीं म्हणी, व कांहीं कविता लिहिल्या आहेत. तर शिक्षकाने मुलांस वाचण्याची गोडी लागेल, व अधिक शिकण्याची हौस येईल, अशा प्रकारें शिकविलें पाहिजे.

## धडा १.

## कुत्रा आणि त्याचें प्रतिबिंब.



एक कुत्रा तोंडीं भाकरीचा तुकडा धरून नदी उतरून पलीकडे जात होता, त्यानें आपली पडछाया पाण्यांत पाहिली. तेव्हां त्यास असें वाटलें कीं, हा कोणी दुसरा कुत्रा भाकर तोंडांत घेऊन जात आहे, ती भाकर आपण त्याजवळून घ्यावी. असा विचार करून तो तोंड उघडून लोभानें ती धरावयास गेला, तों तोंडांतील भाकर पाण्यांत पडून तळीं गेली, ती पुन्हां त्यास सांपडली नाहीं.

### तात्पर्य.

देवानें आपणास जें दिलें आहे त्यामध्यें संतोष

न मानून जो दुसऱ्याचें घ्यावयास पाहतो, त्यास तें मिळत नाहीं, आणि जवळ असतें तेंही जातें.

## धडा २.

## अस्वल.



### आर्या.

॥ अस्वल बळकट भेसुर ॥ परि भय न धरून त्यास जन धरिती ॥
॥ मार्गी खेळवुनी त्या ॥ दरवेशी पोट त्यावरी भरिती ॥ १ ॥

अस्वल हा पशु बळकट आणि भयंकर आहे. ह्याच्या जाती पुष्कळ आहेत. युरोपाच्या उत्तरेस आणि ग्रीस, मिसर, हिंदुस्थान ह्या देशांत हा असतो. दरवेशी लोक ह्यास रानांतून धरून आणून लोकांच्या दारोदार फिरवितात, आणि रस्त्यांत नाचवितात. कितीएक देशांत ह्याच्या कातड्याचें अंथरूण, पांघरूण, व जोड्याचे तळ करितात, आणि ह्याच्या हाडांच्या कोयत्या करितात.

## धडा ३.

### वाक्यें.

घर, घराला, घरास, घरानें, घराच्या, घरांत, घराकडे, घरापासून, घरावर, घराखालीं, घराजवळ, घराशीं, घराविषयीं, घरीं.

हें घर लहान असून सोईचें आहे. ह्या घराला रंग द्यावयाचा आहे. ह्या घरास घेऊन मी काय करूं? त्या घराचा धनी मी आहें, त्याचें मोल मला पुसा. त्या घरांत बहुत माणसें राहतात, त्यांला ती जागा पुरत नाहीं. घराकडे येत असतां मीं मोठा वाघ पाहिला. तूं घरापासून लांब गेला होतास, म्हणून माझी हाक तुला ऐकूं आली नसेल. तो घरावर चढला होता तेव्हां पाऊस पडूं लागला. घराखालीं मोरी आहे, म्हणून भुईला ओल आलें आहे. जर तूं माझ्या घराजवळ येशील, तर मी तुला मारीन. त्या घरानें मला खर्चाखालीं आणिलें. घराशीं घर लागलें आहे. घराविषयीं मी काळजी करीत नाहीं. तो घरीं आहे.

---

## धडा ४.

### चांगला मुलगा.

चांगला मुलगा लवकर उठून शाळेस जातो. वाईट मुलगा शाळेस जातांना रडतो. चांगला मुलगा

आईबाप सांगतील तसें ऐकतो. वाईट मुलगा हट्ट करून मार खातो. चांगला मुलगा पंतोजीच्या आज्ञेंत राहतो. वाईट मुलगा आपला धडा पाठ करीत नाहीं. चांगला मुलगा खोटें बोलत नाहीं, खरें बोलतो. वाईट मुलगा शेजाऱ्याच्या मुलास मारितो, शिव्या देतो. शहाणा मुलगा खाऊसाठीं हट्ट करीत नाहीं. वाईट मुलगा दुसऱ्याची वस्त चोरून नेतो. शहाणा मुलगा आपलें काम वेळच्या वेळेस करितो.

---


धडा ९.

## वेडा मुलगा.

जो मुलगा आपली पोथी जपून ठेवीत नाहीं, मळवितो, त्याला वेडा म्हणावें. शहाणा मुलगा आपली पोथी फाडीत नाहीं, आणि पोथीवर शाई पाडीत नाहीं. वाईट मुलगा टवाळकी करितो. चांगला मुलगा दुसऱ्या पोरांशीं भांडत नाहीं, व त्यांच्या खोड्या करीत नाहीं. वेडा मुलगा आईबापांचें सांगितलें ऐकत नाहीं. वाईट मुलगा कोणास आवडत नाहीं. चांगला मुलगा सर्वांस आवडतो. वाईट मुलावर कोणी प्रीति करीत नाहीं. चांगल्या मुलावर सर्व लोक प्रीति करितात, म्हणून मुलानें आणि मुलीनें चांगलें व्हावें.

## धडा ६.

# मधमाशांचें कृत्रिम घर.



मुलांनो, हें वरील चित्र पहा. हें कोणाचें घर आहे समजलें? हें मधमाशांचें घर आहे. असें घर मधमाशा रहावयासाठीं इंग्लंदांत लोक करीत असतात. मधमाशा जशा मेहनती आहेत तसे दुसरे थोडेच प्राणी असतील. आळशी मुली आणि मुलगे ह्यांहीं त्यांपासून शिक्षा घ्यावी म्हणून त्यांचें उदाहरण येथें दाखविलें आहे. तर ते प्राणी जसे मेहनती आणि चपळ तसे तुम्ही व्हा. पहांटेस उठा, आणि बाहेर फिरावयास जा, अथवा घरीं राहून योग्य कामें करावयास लागा. मुलांनो, हे लहान चपळ आणि मेहनती

प्राणी तुम्हांकरितां कांहीं पदार्थ जमवितात, तो कोणता, आणि तो हे प्राणी कोठून आणितात, हें सांगा.

---

धडा ७.

वाक्यें.

हा }
हें } ह्यास, ह्याला, ह्याचा, ह्यानें.

ही, हीस, हिला, हिचा, हिनें.

हे }
ह्या } ह्यांस, ह्यांला, ह्यांचा, ह्यांनीं.
हीं }

हा मुलगा नुकता शाळेंत आला. ह्यास येऊन एक महिनाही पुरता झाला नाहीं; इतक्यांत ह्याला चांगलें वाचतां कसें येईल? ह्यानें नित्य नेमानें शाळेंत यावें, म्हणजे ह्याचा अभ्यास चांगला चालेल.

ही मुलगी शहाणी आहे. हीस कोणी वाईट म्हणत नाहीं. हिला एकदां सांगितलें म्हणजे पुरतें. हिचा अभ्यास चांगला आहे. हिने सर्व धडे तोंडपाठ केले आहेत.

हें पोर अगदीं मूर्ख आहे. ह्यास धडा पाठ करण्याची काळजी नाहीं. ह्याला खेळायास पाहिजे. ह्यानें कालचा धडा अजून पाठ केला नाहीं.

हे मुलगे बुद्धिवान आहेत. ह्यांस विद्येची आवड आहे. ह्यांला खेळणें आवडत नाहीं. ह्यांचा स्वभाव चांगला आहे. ह्यांनीं थोड्या दिवसांत अभ्यास पुष्कळ केला.

ह्या मुली कोणाच्या ? ह्यांस कोणीं बोलाविलें ? ह्यांला येथें येण्याचें काम कोणतें ? ह्यांचा बाप कोठें आहे ? ह्यांनीं आपल्या आईकडे जावें.

हीं मुलें उनाड दिसतात. ह्यांस कोणी रागें भरत नाहीं. ह्यांला कोण संभाळतो न कळे. ह्यांचा खेळ वाईट दिसतो. ह्यांनीं पहा कसा गोंगाट केला आहे तो!

धडा ८.

## धनगराचा पोर.



एका धनगराचा पोर मेंढरें राखीत असतां, लांड-


गा आला, रे, लांडगा आला, म्हणून थट्टेनें वेळोवेळीं ओरडत असे. तें ऐकून जवळच्या शेतांतून कुळंबी धांवून येत, आणि पहात तों तेथें लांडगा नाहीं. असे दोन चार वेळां ते फसले; तेव्हां त्यांनीं निश्चय केला कीं, पोर लबाड आहे, ह्याची हांक पुन्हा मनास आणूं नये. मग एके दिवशीं लांडगा खराच आला, त्यासमयीं घाबरून तो पोर हाका मारूं लागला. तेव्हां, पहिल्याप्रमाणें हीहि लबाडी असेल, असें समजून कोणी धांवून गेला नाहीं. मग त्याचीं तीं मेंढरें लांडग्यानें सावकाश मारून खाल्लीं.

### तात्पर्य.

जो मनुष्य लबाड असा एकवेळ समजला, त्याच्या बोलण्यावर मग लोक विश्वास ठेवीत नाहींत. तो खराहि संकटांत असला तरी त्याची गोष्ट खोटी मानून त्यास कुमक करीत नाहींत.

## धडा ९.

# तारे.



हें चित्र ताऱ्यांचें म्हणजे नक्षत्रांचें आहे. ताऱ्यांत आपल्या दृष्टीस न पडणारे असे तारे बहुत आहेत; ते दुर्बिणीनें मात्र पाहण्यांत येतात. ताऱ्यांची गणती करितां येत नाहीं. प्रत्येक तारा हा सूर्य मानिला आहे. आपल्या सूर्याभोंवतीं जशी ग्रहमाला आहे, तशी त्या प्रत्येक सूर्याभोंवतीं ग्रहमाला असेल. हे तारे किती दूर आहेत हा निश्चय करणें आपणांस अशक्य आहे; म्हणून ते अंतरिक्षांत आहेत आणि तेथून आपणांवर प्रकाशतात इतकें समजावें.


## धडा १०.

## किड्यांविषयीं.

सर्व प्राण्यांमध्यें लहान प्राणी म्हटले म्हणजे किडे आहेत. मुंग्या, ढेंकूण, चिलटें, पिसा, हे सर्व किडे होत. पतंग हा एक मोठा छानदार किडाच आहे. ह्याच्या पंखांवर किती तऱ्हेतऱ्हेचे रंग असतात! बागेंत फुलें उमललीं म्हणजे पतंग ह्या फुलावरून त्या फुलावर, आणि त्या फुलावरून दुसऱ्या फुलावर, उडत असतात. ते फुलांतला मध खातात. मधमाशा मोठे उद्योगी किडे आहेत. त्या कधीं उगीच बसावयाच्या नाहींत. फुलांतील रसापासून त्या मध करितात, म्हणून त्यांस मधमाशा असें म्हणतात. ढेंकूण, मुरकुटें, डांस, चिलटें, पिसा, वगैरे किडे हे आपणा माणसांस उपद्रवी आहेत. दिवसास ते आपणांला त्रास देतात, आणि रात्रीं आपण निजलों म्हणजे आपणांला चावतात; तरी पांखरें, मासे, वगैरे प्राणी अशा किड्यांना खातात; तेव्हां पांखरांस व माशांस ह्यांचा मोठा उपयोग आहे.

## धडा ११.

### यारी.



( ओझीं उचलण्याचें यंत्र. )

तारवांतून घोडे अथवा दुसरें कांहीं मोठें ओझें धकच्यावर उतरावयाचें हें यंत्र आहे. ह्या यंत्रास एक सांखळ असते तीस ओझें बांधून चाक फिरविलें म्हणजे तें ओझें धकच्यावर येऊन पडतें.

## धडा १२.

### वाक्यें.

| | |
|---|---|
| माझा, माझी, माझें. | माझे, माझ्या, माझीं. |
| तुझा, तुझी, तुझें. | तुझे, तुझ्या, तुझीं. |
| त्याचा, तिचा, त्याची. | त्याचे, तिचे, त्याच्या. |
| तिची, त्याचें, तिचें. | तिच्या, त्याचीं, तिचीं. |
| आमचा, आमची, आमचें. | आमचे, आमच्या, आमचीं. |

| | |
|---|---|
| तुमचा, तुमची, तुमचें. | तुमचे, तुमच्या, तुमचीं. |
| त्यांचा, त्यांची, त्यांचें. | त्यांचे, त्यांच्या, त्यांचीं. |

माझा आंबा मी तुला देईन; तुझा आंबा तूंच खा. त्याचा आंबा तोच खाईल; तिचा आंबा ती बहिणीस देणार आहे.

माझा बाप, माझी आई, माझे भाऊ, माझ्या बहिणी व घरांतील चाकर माणसें हीं सर्व मला चाहतात.

माझें घर लहान आहे; तुझें घरही तसेंच आहे; तरीं त्याचें घर व तिचें घर हीं मोठीं व सोईचीं आहेत.

तुझे घोडे आहेत, तुझ्या गाई आहेत, तुझीं मेंढरें आहेत, ह्या मुक्या जनावरांची राखण करणें तुलाच भाग.

त्याची आत, त्याचे चार आतेभाऊ, त्याची मावशी, त्याच्या दोन भाऊबहिणी, व दुसरीं त्याचीं नातलगें हीं सर्व आज माझ्या घरीं आलीं आहेत.

आमचा देश आम्हांला आवडतो, तुमचा देश तुम्हांला; तशीच तुमची रीत तुम्हांला, आमची रीत आम्हांला.

आमचें वतन व तुमचें वतन एकसारखेंच आहे; पण त्याचें वतन निराळें आहे.

त्याचा चुलता व त्याचे चुलतभाऊ आले आहेत;

पण त्याची चुलती व त्याच्या चुलत बहिणी घरीं राहि-
ल्या आहेत.

---

धडा १३.

## माती.


माती फार उपयोगाची आहे. माती तांबडी असते, काळी असते, पिंवळी असते, व पांढरी असते. मातीमध्यें शेतें व झाडें उगवतात. माती भिजली म्हणजे तिचा चिखल होतो, आणि तिचे आंगीं चिकणाई येते; ह्याकरितां पाणी बाहेर जाऊं नये म्हणून पाटास चिखलाचा बांध घालितात. मातीचा गारा करून त्यांत गवत तोडून घालितात. मंतर त्या गाऱ्याचा गिलावा भिंतीस करितात. माती उन्हानें घट्ट होते, ह्यास्तव तिच्या विटा, कौलें, मडकीं, वगैरे करितात. वाळूनें मिसळलेली माती खणून आणितात. आणि ती भिजवून मळून तयार करितात. मग लांकडाचें विटाळें असतें त्यांत ती माती घालून विटा पाडितात; त्या विटा उन्हानें वाळल्या म्हणजे भाजण्याकरितां भट्टींत घालितात, आणि भाजून लाल झाल्या म्हणजे बाहेर काढितात. भाजलेल्या विटांस पक्या विटा म्हणतात, आणि भाजण्याच्या अगोदर त्यांस कच्चया विटा

म्हणतात. भिंत रचतांना विटांच्या पोटीं चिखलाचा थर देतात, तेणेंकरून भिंत बळकट होते.

---

## धडा १४.

## सांबर.



### दिंडी.

॥ सांबराचे ते कळप धांव घेती ॥ कशी शोभे चांगली चपळ जाती ॥
॥ शिरीं शिंगें सुंदर शोभताती ॥ फळें पानें चांगलीं वनीं खाती ॥


सांबर हा वनपशु देखणा आहे. ह्याच्या डोकीवर उभीं दोन शिंगें असतात. प्रत्येक शिंगास खालीं एक व वर एक असे दोन तीन फांटे असतात. त्याच्या योगानें ह्याच्या डोक्यास फार शोभा येते. सांबराचीं शिंगें लोखंडासारखीं बळकट व जाड असतात. हीं शिंगें औषधाच्या उपयोगीं पडतात.

सांबर हरणापेक्षां कांहीं मोठें असतें, ह्याचे पाठी-
वरच्या केंसांचा रंग तांबूस असतो, आणि पोटाखालचे केंस पांढरे असतात. सांबर कळप करून राहतात. आणि रानांतील झाडपाल्यावर उपजीविका करितात.

---

## धडा १९.

## आगगाडी.




आगगाडी ओढावयास घोडे, बैल इत्यादि जनावरांची मदत लागत नाहीं. ही गाडी वाफेच्याच जोरानें जेवढी पाहिजे तेवढी हळू अथवा जलद जाते. फार जलद म्हटलें म्हणजे एका मिनितांत १ पासून २ मैलपर्यंत जाते, म्हणजे मुंबईतील कोटाच्या देवळाजवळून आपणांस फार जलदीनें माहिमास जावयाचें असेल तर चार पांच मिनितांत जाऊं. परंतु इतक्या जलदीनें आगगाडी चालवीत नाहींत. कां कीं अशा वेगानें फार नुकसान होतें. ह्या वेगाचें मान कमी-

जास्त करितां येतें. आगगाडी दोन मिनितांत एक मैल जाई ह्याप्रमाणें तिचा साधारण वेग ठेवितात.

---

## धडा १६.

## मिसर देशांतील गाडी.



मिसर देशांतील प्राचीन काळच्या लोकांच्या गाडीचें हें सुंदर चित्र आहे. त्या देशची एक राजकन्या ह्या गाडींत बसून थीब्स नांवाचें प्रख्यात शहर पाहायाकरितां जात आहे. ह्या गाडीस दोन बैल जोडिले आहेत. गाडी हांकणारा एक माणूस बैलांच्या पागा हातीं धरून गाडीवर बसला आहे; आणि दुसरा माणूस बैलांची चाकरी करावयाकरितां व त्यांस दाणा घालावयाकरितां पुढें उभा आहे. राजकन्येस ऊन न लागावें म्हणून गाडीवर एक छत्री जडलेली आहे.

## धडा १७.

### वाक्यें.

मोठा, थोर, उंच, ताजा, लठ्ठ, रोड, द्वाड, गोरा, काळा, ओला, सुका, दाट, निळा, लाल, गोड, घट्ट, धीट, वेडा, नीट, थंड, उन्ह.

तो तुजपेक्षां मोठा आहे. जो आपणापेक्षां वयानें थोर आहे त्याला आपण अहो असें म्हणावें, अरे म्हणूं नये. तुमच्या घोड्यापेक्षां माझा घोडा चार बोटें उंच आहे, पण ताजा होत नाहीं. तुमचा घोडा अलीकडे लठ्ठ झाला, पहिला असाच रोड होता. द्वाड घोडा लहान मुलांच्या बसण्यास उपयोगी नाहीं. हा मुलगा पहिल्यानें गोरा होता, आतां काळा कशानें झाला? घामानें माझा आंगरखा ओला झाला आहे, म्हणून हा काढून दुसरा सुका घालितों. बंगल्याभोंवतीं फुलझाडें दाट आहेत. कितीएक फुलांचा रंग निळा आहे, कितीएकांचा लाल आहे. पिकल्या फळांचा वास गोड येतो. ह्या आंब्याचा रस घट्ट आहे. धीट मुलगा वाचतांना घाबरत नाहीं. तूं वेडा आहेस; तुला समजत नाहीं. त्या वाटेपेक्षां ही वाट नीट आहे. वारा सकाळीं थंड असतो, दुपारीं ऊन्ह होतो.

## धडा १८.

# वारा, पाऊस.

उन्हाळ्यांत गार वारा आला म्हणजे मोठा आनंद होतो. पावसाळ्यांत व हिंवाळ्यांत गार वारा सुटला तर तो अंगास झोंबतो. मोठा वारा सुटला म्हणजे धुळीनें सर्व दिशा धुंद होतात, आणि कांहीं दिसेनासें होतें. अशा वाऱ्यांत छत्री उघडून चालण्याचा इलाज नसतो. व वाळूंतून चाललें असतां खडे सटासट पायांवर येऊन बसतात, व कण डोळ्यांत शिरतात. मोठ्या वाऱ्यानें झाडें देखील पडतात.

उन्हाळा संपला म्हणजे पावसाळा लागतो. पावसाळा लागण्याच्या सुमारास बहुतकरून पावसांत गारा पडतात. गारा पडून जमिनीवर ह्यांचा थर झाला म्हणजे मोठी मौज दिसते. पाऊस पडला म्हणजे झाडांस टवटवी येते, व चहूंकडे जमिनीवर दाट गवत उगवतें, आणि सर्व धान्यें पिकतात. पाऊस पुष्कळ पडला म्हणजे नद्यांस पूर येतात, तळीं, विहिरी पाण्यानें भरून जातात. ज्या वर्षी पाऊस पडत नाहीं, त्या वर्षी पाण्याचा दुष्काळ पडतो, व शेतें, गवतें, उत्पन्न होत नाहींत, ह्यामुळें फार महागाई होते. पावसाळा लागण्याच्या सुमारास लोक घरें शाकारितात, व शेतें नांगरितात.

## धडा १९.

## सोनें, रुपें, तांबें.

सर्व धातूंमध्यें सोनें उत्तम आहे. सोनें थोडें सांपडतें म्हणून महाग विकतें. सोन्याचा रंग पिंवळा असतो, आणि त्याच्या आंगीं चकाकी असते. सोनें फार जड असतें व मऊ असतें. श्रीमंत लोक आंगावर घालण्याकरितां सोन्याचे दागिने करितात. सोन्याचा पत्रा पातळ फारच होतो, व तार पाहिजे तितकी बारीक होते. सोन्याचा मुलामा करितात.

रुप्याचा रंग पांढरा असतो. ह्याचे आंगीं चकाकी फार असते. ह्याचे रुपये पाडितात व दागिने करितात. श्रीमंत लोक ताट, वाट्या, गडवे, पेले, चौफुले, अत्तरदाण्या, गुलाबदाण्या, वगैरे भांडीं रुप्याचीं करितात. सोन्याप्रमाणें रुप्याचाही मुलामा होतो.


तांब्याचा रंग तांबूस असतो. ह्याला फार नाद आहे. तांब्याच्या आंगीं चिवटपणा आहे. ह्याची तार पुष्कळ लांब काढिली तरी तुटत नाहीं. तांब्याचीं पुष्कळ प्रकारचीं भांडीं करितात. तांब्याच्या घागरी करितात, पातेलीं करितात, व पाण्याच्या सांठवणाकरितां मोठमोठाले हांडे व तपेलीं करितात. तांब्यांत जस्त मिळविलें म्हणजे पितळ होतें.

पितळाचा रंग पिंवळा असतो. ह्याचीं नानाप्रकारचीं भांडीं करितात. नाशिक व काशी येथें पितळाचीं फार सुरेख भांडीं करितात. पितळावर व तांब्यावर जो कळंक येतो तो शुद्ध विष आहे. तो हिरवा असतो, त्याचा हिरवा रंग करितात.

---

## धडा २०.

### तंबू.



प्रवासी लोकांस तंबूचा मोठा उपयोग आहे. तंबू पुष्कळ प्रकारचे असतात. कितीएकांस मध्यें एक खांब असतो, जसा वरील चित्रांत आहे, त्यास एकखांबी तंबू म्हणतात. कितीएकांस दोन खांब असतात त्यांस दुखांबी तंबू म्हणतात. ह्यास डेराही म्हणतात. तंबूच्या वरच्या भागास टप असें म्हणतात. आणि खालच्या भागास कनात म्हणतात.

ही कनात समोंवतीं लावितात. टप एकेरी अथवा दुहेरी असतें. टप दुहेरी असलें तर कनातही दुहेरी असते. दुहेरी तंबूंत वरून अथवा बाजूनें ऊन आणि थंडी ह्यांची फारशी बाधा होत नाहीं.

जेव्हां राजे लोक शिकारीस जातात, अथवा सरकारी कामदार लोकांच्या स्वाऱ्या फिरावयास निघतात, तेव्हां त्यांचें तंबूशिवाय चालतच नाहीं. हें कापडाचें घर बहुधा जेथें पाहिजे तेथें थोड्याशा कष्टानें नेतां येतें. आणि जसें खर्च करण्याचें सामर्थ्य असेल तशा त्यामध्यें सोईही करितां येतात. श्रीमंत लोक तंबूस आंतून किनखाबानें मढवितात.

दुसरी एक तंबूची जात आहे तिला रावटी म्हणतात. रावटीहूनही लहान एक जात आहे तीस पाल म्हणतात. ही गरीब लोकांच्या उपयोगीं पडते.

हल्लीं जबलपूर एथील उद्योगशाळेंत सर्व प्रकारचे तंबू तयार करितात.

---

## धडा २१.

## पारा, लोखंड, कथील.

पारा खाणींतून काढितात. पाऱ्याचा रंग पांढरा असतो. पारा पातळ असतो, तरी त्याला हात लाविला असतां तो हातास लागत नाहीं. तो जमिनीवर

पडला असतां फुटून त्याच्या लहान लहान गोळ्या होतात. पान्यांत कथील मिसळून तो भिंगाच्या एका आंगास लाविला म्हणजे आरसा होतो, व त्यांत पदार्थांचीं प्रतिबिंबें दिसतात.

लोखंड फारच उपयोगी धातु आहे. लोखंड फार स्वस्त असतें. नांगराचे फाळ, कुदळी, कुऱ्हाडी, कोयते, खिळे, तवे वगैरे पदार्थ लोखंडाचे करितात, लोखंड फार तापविलें म्हणजे त्याचें पोलाद होतें. चाकू, कातरी तरवारी, सुऱ्या वगैरे नानाप्रकारचीं त्याचीं हत्यारें करितात.

कथील रूप्यासारखें पांढरें व चकचकीत दिसतें. पण हें त्यापेक्षां फार हलकें आणि मऊ असतें. विस्तवाजवळ ठेविलें असतां तेव्हांच वितळावयास लागतें. कथलाच्या भांड्यांत आंबट पदार्थ कळंकत नाहीं, म्हणून दहीं, ताक, वगैरे आंबट पदार्थ ठेवण्याकरितां ह्याचीं भांडीं करितात. तांब्याच्या व पितळाच्या भांड्यांत आंबट पदार्थ तेव्हांच कळंकतात. ह्याकरितां त्यांस कथलाची कल्हई लावितात. कल्हई लाविली असतां ते कळंकत नाहींत.

---

## धडा २२.

## वाक्यें.

लहान, उंच, रोडका, बोलका, सुंदर, चतुर,

तांबडा, हिरवा, पिंवळा, पांढरा, पातळ, बारीक, तुरट, आंबट, तिखट, धुवट, मळकट, चिकट.

मी तुजपेक्षां वयानें लहान आहें, तरी तुजपेक्षां उंच आहें. रोडका बैल गाडीस जुंपूं नको. ह्या दोन राघूं-मध्यें बोलका कोणता ? हा राघू सुंदर आहे, पण चतुर नाहीं. ह्याच्या सर्व आंगाचा रंग हिरवा आहे, पण चोंचीचा रंग तांबडा आहे. पावसाळ्यांत चिमणीचा रंग पिंवळा होतो. खबुतराचा पांढरा रंग कधीं पालटत नाहीं. मला पांढरा आंगरखा करावयाचा आहे, त्याला कापड पातळ आणि बारीक पाहिजे. तूं मळकट आंगरखा कां घालितोस ? धुवट कां घालीत नाहींस ? हा आंबा अजून आंबट झाला नाहीं, तुरट आहे. आंब्याच्या चिकानें माझा हात चिकट झाला.

---

## धडा २३.

## शहाणा व द्वाड.


| | |
|---|---|
| शहाणा मुलगा. | द्वाड पोर. |
| शहाण्या मुलग्याचा. | द्वाड पोराचा. |
| शहाण्या मुलग्यानें. | द्वाड पोरानें. |
| शहाण्या मुलग्यास. | द्वाड पोरास. |
| शहाणे मुलगे. | द्वाड पोर. |
| शहाणे मुलग्यांचा. | द्वाड पोरांचा. |

शहाणा मुलगा शाळेस जाण्याविषयीं हट्ट करीत नाहीं. द्वाड पोर दुसऱ्याच्या मुलांस शिव्या देतो. शहाण्या मुलाचा बाप आपल्या मुलाकडे पाहून संतोष पावतो. द्वाड पोराचा बाप आपल्या पोराकडे पाहून दु:खी होतो. शहाण्या मुलानें आपले कागद जपून ठेविले. द्वाड पोरानें आपले कागद फाडून, तोडून, नासून, टाकिले. शहाण्या मुलास गांवांतील सर्व लोक चाहतात. द्वाड पोरास कोणी जवळ उभें राहूं देत नाहीं. शहाणे मुलगे दहा जरी एके ठिकाणीं बसले, तरी कज्जा, भांडण व्हावयाचें नाहीं, पण द्वाड पोर दोन असले तरी कज्जा करावयास चुकणार नाहींत. शाळेंत मुलें पुष्कळ असतात, पण शहाण्यानें शहाण्या मुलांचा संग धरावा, द्वाड पोरांचा वारा देखील पडूं देऊं नये.

---

## धडा २५.

## आगबोट.



सांप्रत काळीं वाफेच्या साहाय्यानें एका ठिकाणाहून दुसरे ठिकाणीं जाणें फार सोपें झालें आहे.

त्यांत जळमार्गानें जाणें झाल्यास वाफेच्या जहाजांतून जातात, आणि जमिनीवरून जाणें झाल्यास लोखंडी सडका तयार करून त्यांवरून वाफेच्या गाड्यांतून जातात. व्यवहारांत वाफेच्या जहाजास आगबोट म्हणतात, त्याचें कारण इतकेंच दिसतें कीं प्रथमतः जेव्हां लोकांची ह्या जहाजांकडे दृष्टि जाते तेव्हां तीं आगीच्या जोरानें चालतात अशी आग दृष्टीस पडल्यामुळें सहज कल्पना उत्पन्न होते. नंतर विचाराअंतीं पाहिलें म्हणजे मात्र वाफेच्या बळानें गति उत्पन्न होते असें दिसतें.

आगबोटींतून हुकमीं एका जाग्यापासून दुसऱ्या जागीं जातां येतें, त्यामुळें दूरच्या देशीं डांका नेण्याचे कामास हल्लीं आगबोटी लावितात. विलायतची डांक हल्लीं थोडीशी मजल खेरिज करून बाकी आगबोटींतून जाते येते. मिसरदेशांतील व तशी चीन, आस्त्रालिया, इत्यादि दूरदूरच्या देशचीही आगबोटींतूनच जाते येते.

सांप्रत मुंबई येथें बऱ्याच व्यापारी आगबोटी आहेत ह्यामुळें गुजराथ, सिंधदेश, मलबार, इत्यादि प्रांतांत लोकांस जाणें फार सुलभ झालें आहे.

## धडा २५.

## थोरपणा आणि उपकार.

मागें एका शहरांत कोणी एक मोलकरी राहत असे; त्यास वाटेंत एक पिशवी सांपडली, तींत दोनशें रुपये होते. तें वर्त्तमान त्यानें शहरांत जाहीर केलें. ज्या गृहस्थाची पिशवी सांडली होती, त्यास तें समजतांच तो त्या मोलकऱ्याच्या घरीं गेला, तेव्हां त्यानें तें द्रव्य आपलें अशी पक्की खातरी करून दिल्यावर मोलकऱ्यानें पिशवी त्याच्या स्वाधीन केली. ती घेऊन संतोषानें तो गृहस्थ मोलकऱ्यास वीस रुपये देऊं लागला, ते मोलकरी घेईना, नंतर दहा देऊं लागला तेंही घेईना; तेव्हां त्या गृहस्थास राग येऊन ती पिशवी त्यानें भुईवर आदळली, आणि म्हणाला, जर तूं मला उपकार फेडूं देत नाहींस तर माझें कांहींच गेलें नाहीं. ते समयीं मोलकऱ्यानें त्यापासून पांच रुपये घेऊन तो गेल्यावर लागलेंच ते भिकाऱ्यांस वांटून दिले.

---

## धडा २६.

## सूर्य, दिवसाचे विभाग, आणि काळ.

सूर्य उगवला म्हणजे उजेड पडतो, आणि सूर्य मावळला म्हणजे अंधार पडतो. सूर्य उगवल्यापासून

मावळेपर्यंत दिवस, आणि सूर्य मावळल्यापासून तो पुन्हा उगवेपर्यंत रात्र. दिवसाचे चार प्रहर, आणि रात्रीचे चार प्रहर. दुपारपासून मध्यरात्रीपर्यंत बारा तास, आणि मध्यरात्रीपासून दुपारपर्यंत बारा तास. असे दिवस आणि रात्र मिळून चोवीस तास होतात. अडीच घटकांचा एक तास, अशा तीन तासांचा एक प्रहर, आठ प्रहरांचा एक दिवस. आणि सरासरी तीस दिवसांचा एक महिना. अशा बारा महिन्यांचें एक वर्ष होतें.

एका वर्षांत तीन काळ असतात. हिंवाळा, उन्हाळा, आणि पावसाळा. हिंवाळ्यांत थंडी कडक पडते; उन्हाळ्यांत ऊन्ह फार होतें; आणि पावसाळ्यांत पाऊस वारंवार पडतो.

## धडा २७.

## उंट.



उंट हा पशु अगदीं कुरूप आहे, तरी ह्या पशून

अरब लोक मोठी संपत्ति मानितात. अरबस्थानांतील वाळूच्या प्रदेशांत जेथें कितीएक दिवसपर्यंत अन्न व पाणी मिळत नाहीं, तशा प्रदेशांत हा पशु ओझें घेऊन भूक तहान सोसून मजल करितो. कोणे समयीं प्रवासी लोकांस जेव्हां रस्त्यांत कोठें पाणी मिळत नाहीं तेव्हां ते त्याचें पोट चिरून त्याच्या पोटांत पाण्याची एक पिशवी असते तींतील पाणी पितात. ह्याप्रमाणें हा पशु फारच कामाचा आहे; असें असतां ह्याच्या कुरूपपणावर कितीएक असमंजस लोक ह्याचा धिक्कार करितात, हें किती वाईट बरें! सद्गुण कांहीं चांगले देखण्या प्राण्यांतच सर्वदां दृष्टीस पडत नाहींत. सुरूप माणसें फारच दुर्गुणी, आणि कुरूप माणसें सद्गुणी अशींही अढळतात. ह्याजकरितां, मुलानो, तुम्ही कोणास कुरूप पाहून त्याचा धिक्कार न करितां त्याच्या गुणांकडे दृष्टि लावा.

---

# धडा १८.

## मेंढरूं.



श्लोक.

मेंढ्यावरी लोंकर दाट भारी ॥ थंडीस त्याच्या बहुधा निवारी ॥
स्वभावही फार गरीब ह्याचा ॥ कामीं पडे देह बहू तयाचा ॥

मेंढरूं सर्व पशूंत गरीब आणि साधें आहे. हें बहुतकरून सर्व देशांत असतें. मेंढराच्या जाती पुष्कळ आहेत. लोक ह्यांच्या लोंकरीच्या घोंगड्या, कांबळीं, बुरणूस, सकलादी, इत्यादि उबेचीं वस्त्रें करितात. ह्यांच्या कातड्याचे जोडे करितात, व ह्यांच्या कातड्यानें बुकें बांधितात. काश्मीर देशांतल्या मेंढरांचीं शेपटें रुंद असून त्यांवरील लोंकर फार मऊ असते. म्हणून त्या लोंकरीच्या शाली, धुसे, वगैरे उंची वस्त्रें करितात. मेंढरांतील नरास मेंढा, मादीस मेंढी, आणि पोरास कोंकरूं असें म्हणतात. मेंढरांचे बहुतकरून कळप असतात.

## धडा २९.

### अस धातूचीं वाक्यें.

| | |
|---|---|
| आहें, आहेस, आहे. | आहों, आहां, आहेत. |
| होतों, होतास, होता. | होतों, होतां, होते. |
| असेन, असशील, असेल. | असूं, असाल, असतील. |

आज मी पुण्यांत आहें. काल मुंबईत होतों. उद्यां नगरांत असेन.

आज तूं जागा आहेस. काल निजला होतास. उद्यां जागा असशील काय ?

रामा कोठें आहे ? मघाशीं येथें होता. तो बागेंत असेल.

आम्ही आज घरींच आहों. कालमात्र बागेंत गेलों होतों. उद्यांपासून घरींच असूं.

तुम्ही बसलां आहां तों मी माघारां येतों. काल तुम्ही येथें होतां म्हणून मी आलों नाहीं. तुम्ही घरीं असाल तेव्हां मी येईन.

आतां मुंबईतले लोक श्रीमंत आहेत. पुण्यांतले लोक मागें तसे होते. आतां ते कसे असतील हें ठाऊक नाहीं.

## धडा ३०.

### हो धातूचीं वाक्यें.

| | |
|---|---|
| होतो, होतोस, होतो. | होतों, होतां, होतात. |
| झालों, झालास, झाला. | झालों, झालां, झाले. |
| होईन, होशील, होईल. | होऊं, व्हाल, होतील. |

मी तुझा धनी होतों. तूं माझा चाकर हो. तुला पाहून मी सुखी झालों. मी रिकामा होईन तेव्हां येईन.

तूं माझा गडी होतोस ? तूं दुखण्यानें रोड झालास. औषध घे म्हणजे ताजा होशील.

पोटांत रोग केव्हां होतो हें अगोदर समजत नाहीं, रोग झाला म्हणजे समजतें. तो कधीं बरा होईल कोण जाणे.


चला आम्ही तुम्हांला जामीन होतों. वाघाला पाहून आम्ही घाबरे झालों. आम्ही खोटें बोलूं तर देवाचे अपराधी होऊं.

मी आलों तेव्हां तुम्ही निजलां होतां. मग केव्हां जागे झालां नकळे. लवकर काम कराल तर लवकर मोकळे व्हाल.

जीं मुलें विद्या शिकून हुशार होतात तीं लोकांस आवडतात. त्यांचे मुलगे विद्वान् झाले, तसे तुमचे-ही होतील.

## धडा ३१.

## ससा.



ससा हें गोजिरवाणें जंगली जनावर आहे. हें चार व दाणा खातें. सशांला रहावयास सुकी जागा पाहिजे, म्हणून हे झाडींत किंवा शेतांत जेथें माती भुसभुशीत असते तेथें उकरून बिळें करतात. घारी, कोल्हे, कुत्रीं, व रानांतील श्वापदें ह्यांला मारितात. ह्यांला बहुत शत्रु असतां ह्यांच्या आंगीं लढण्याची शक्ति कांहींच नसते; पण देवानें ह्यांला लांब कान व उंच डोळे देऊन ह्यांनीं दुरून लवकर ऐकावें व पहावें असें केलें आहे. हा प्राणी भयामुळें सदा सावध असतो, आणि कांहीं भयाचें कारण पाहिलें म्हणजे लवकर पळून जातो.

उत्तर देशांत थंडीच्या दिवशीं कितीएक जनावरांचे भुऱ्या, काळ्या, व उदी रंगाचे केंस जाऊन त्यांस पांढऱ्या रंगाचे केंस येतात, तसे सशांसही येतात. कितीएक लोक सशाला धरून घरीं बाळगितात. एका गृहस्थापाशीं ससा होता, तो सांजचा त्याच्या खोलींत खेळत असे. वारंवार त्या गृहस्थाच्या हातांतून तो मौजेनें कागद पाडी, व बहुत आर्जव दाखवी. पण जर कोणी परका आला तर भिऊन पळून आपल्या पिंजऱ्यांत जाई.

धडा ३२.

## खार.



खार मोठें चपल जनावर आहे. ही हलक्या आंगाची व जलद धांवणारी आहे. झाडाच्या बुंधापासून धांवत वरतीं डाहाळ्यांपर्यंत जाते. ह्या झाडावरून त्या झाडावर उडी मारिते. ही भुईवर फारकरून चालत नाहीं. पण हिची एक जात भुईंत बीळ उकरिते.

दुसऱ्या जातीच्या खारी झाडाच्या दुबेळक्यांत घरें करितात. तीं गवत, पानें, काटक्या, ह्यांचीं केलेलीं फारच मजबूत असतात. ह्या घराला वरतीं मात्र एक दार असतें. आंत पाऊस न जावा म्हणून दार मोकळें राखून वरतीं एक तिरपी ताटी करितात. खारी आपलें खाणें मिळवून झाडाच्या भोंकांमध्यें सांठवून ठेवितात, आणि जों खाणें बाहेर मिळतें तों त्याला हात लावीत नाहींत., फळें त्रिया हीं मिळत नाहींशीं झालीं म्हणजे आपला सांठा काढून खातात. ह्यांस नानाप्रकारचीं फळें फार आवडतात. ह्यांचे दांत सुक्यासारखे असतात, म्हणून बदामें वगैरे कठीण कंवटीचीं फळें फोडून खातात. ह्यांचें आंग मऊ असतें, ह्यांला शेपटी चांगली शोभा आणिते. ती मोठी आणि लांब असून नेहमी पिंजारलेली दिसते. ह्यांचे कान घोड्याच्या कानांसारखे उभे असतात. खार वानरासारखी बसून हातांनीं खाणें खाते. उत्तरेकडच्या देशांत थंडीच्या दिवशीं ह्यांचे भुरे केस जाऊन पांढरे येतात. खार लवकर माणसाळते.

## धडा ३३.

### बहीणभावांची प्रीति.

### अभंग.

कज्जे कफावती । होवोत रस्त्यांत ॥
असावी घरांत । शांती मोठी ॥ १ ॥
बहीण भावंडें । नांदती ज्या स्थळीं ॥
नसावा बा कळी । तेथें कधीं ॥ २ ॥
पक्षीही लहान । घरटीं बांधोनी ॥
गुण्यागोविंदानीं । राहातात ॥ ३ ॥
मग जीं शाहाणीं । बाळकें आहेत ॥
त्यांमध्यें व्हावेत । कज्जे काय ॥ ४ ॥
उखाळ्या पाखाळ्या । काढोनी भांडावें ॥
वर्दळीस यावें । काय त्यांनीं ॥ ५ ॥
एकामेकावरी । दांत ओंठ खाणें ॥
नाहीं लाजिरवाणें । त्यांस काय ॥ ६ ॥
देवराया आतां । लेंकूर बुद्धीचा ॥
झपाटा रागाचा । माफ करा ॥ ७ ॥
आणखी आमुच्या । रागाच्या लहरी ॥
काढाव्या बाहेरी । मनांतूनी ॥ ८ ॥
इतर जे मळ । संतापासीं मूळ ॥
धुऊनी समूळ । टाका तेही ॥ ९ ॥
जैसे जैसे आम्ही । प्रौढ वया येऊं ॥
भरूनियां जाऊं । प्रेमानंदें ॥ १० ॥
हेंचि आहे तूज । मागायाची गोष्ट ॥
होऊनि संतुष्ट । द्यावी आम्हां ॥ ११ ॥

## धडा ३४.


# ह्या लोकचें कर्तव्यकर्म.

### अभंग.

ह्या लोकीं आपुलें । कर्तव्य कोणतें ॥
सांगतों मी तूतें । ऐक आतां ॥ १ ॥
आरंभोनी आधीं । चांगल्या कर्मासी ॥
त्याहूनि अधिकाशी । मग जावें ॥ २ ॥
नंतर आपण । सर्वोत्कृष्ट कर्म ॥
करूनी स्वधर्म । जागवावा ॥ ३ ॥
ऐशा बा कर्मानें । काळ घालवावा ॥
आभार मानावा । देवाजीचा ॥ ४ ॥
उत्तम नरदेह । सत्कर्मीं लावावा ॥
सुखें तो त्यागावा । मृत्यु पंथें ॥ ५ ॥
सत्कृत्यांचीं पुष्पें । तांडीतचि जावें ॥
सुवासा सोडावें । चोहींकडे ॥ ६ ॥
आपण केलेल्या । परोपकाराचीं ॥
कृत्यें महत्वाचीं । दयायुक्त ॥ ७ ॥
हृदयस्थ भानू । मावळल्यावरी ॥
आठवोनी सारीं । मोठया प्रेमें ॥ ८ ॥
आपुलें बा नाम । लोकांनीं स्मरावें ॥
ऐसेंच वांचावें । जगा माजी ॥ ९ ॥
सद्गुणाचें बीज। पेरी एकपट ॥
होतें शतपट । काळांतरें ॥ १० ॥

## धडा २५.

# घोडा.



घोड्याचे केंस बैलाच्या केंसांपेक्षां बारीक व नरम असतात. ह्याचा आकार फार सुंदर असतो. ह्याचे कान नेहमीं उभे असतात, व ह्याच्या मानेवर लांब केंस असतात. ह्याचा श्वास नाकांतूनच येतो. ह्याचे खूर एका गेळाचे असतात, तरी अमेरिकेच्या दक्षिण बाजूस एका ज़ातीचे घोडे आहेत, त्यांचे पाय दोन गेळांचे असतात. खुराला नालबंदी करितात, नाहीं तर ह्याचे पाय वाटेनें चालून चालून झिजतील. लोक ह्याच्या पाठीवर खोगीर ठेवितात, तोंडांत लगाम देतात, मग त्यावर चढून बसतात. घोड्यावर बसणें ह्यांत लोकांला प्रतिष्ठा वाटते. हा रथ चालवितो, व कंठाळ वाहतो. माणसें ह्याजवर बसून लढाई करितात व शिकार करितात. हा लगामीच्या स्वाधीन आहे; जिकडे ती ओढिली तिकडे हा जातो. ह्याचा स्वभाव

चांगला आहे. ह्याचे आंगीं चांगले गुण बहुत आहेत. घोडा बहुतकरून सर्व देशांत असतो. अरबी घोडे गुणानें व रूपानें चांगले व जलद असतात. अरब लोक आपल्या राहुटींत त्यांस कुटुंबासारिखें बाळगितात.

---

धडा ३६.

## घोड्याची गोष्ट चालू.

एक अरब फार गरीब होता; त्याजवळ चिरगूट पांघरूण कांहीं नव्हतें. परंतु एक सुंदर उमदा घोडा मात्र काय तो होता. तो विकत घ्यावयास एक दूर देशचा माणूस यत्न करूं लागला. पण पहिल्यान अरब विकीना. मग आपण फार दरिद्री असें जाणून त्या माणसाकडे तो आपला आवडता घोडा घेऊन गेला. तेव्हां त्यानें खुशीनें रुपये मोजून त्याला दिले. ते हातीं घेऊन घोड्याकडे आणि रूपयांकडे पाहून अरब म्हणाला, अरे, मी तुला परक्यांच्या हातीं देतों, हे तुला बांधितील, कोण जाणें तुला मारितील, असे तुझे हाल करितील. त्यापेक्षां चल घरीं जाऊं. माझीं मुलें लेंकरें तुला पाहून खुशाल तरी होतील. असें बोलून रुपये तेथें भुईवर फेंकून घोडा घेऊन झटकन निघून गेला.

धडा ३७.

## मुलांचा स्वच्छपणा.

प्रकृति चांगली असो किंवा बिघडली असो, पण मुलांनीं निर्मळ रहावें. सर्व अंग चांगलें स्वच्छ राखावें; कधीं ओंगळ असूं देऊं नये. ओंगळ मुलांकडे पाहावत देखील नाहीं, मग जवळ जाण्याची गोष्ट कशाला पाहिजे ?

मुलांनीं सकाळीं उठून अगोदर तोंड धुवावें, व दांत चांगले घांसावे, म्हणजे तोंडाला घाण येणार नाहीं. मग आपला आंगरखा व टोपी घालून शाळेंत जावें.

आईबापांनीं मुलें लहानपणीं चांगलीं निर्मळ ठेवावीं. त्यांस वेळच्या वेळेस स्वच्छ आंगरखा व टोपी घालावी, म्हणजे तीं निरोगी आणि बळकट अशीं होतील, आणि त्यांस फारसें दुखणेंबाणें येणार नाहीं. तीं खुशाल मौजेनें हिकडे तिकडे हिंडतील, खेळतील. मुलें लहानपणापासून घामट होऊं दिलीं, किंवा त्यांच्या आंगावर ओंगळ चिरगुटें घातलीं, तर तीं रोगी आणि किरकिरीं अशीं होतील.

मुलांचीं चिरगुटें फाटकीं नसावीं. आईबापें गरीब असलीं, तर त्यांनीं मुलांच्या चिरगुटांस ठिगळें लावावीं, आणि वेळच्या वेळेस धुऊन स्वच्छ राखावीं, मळूं देऊं

नयेत, म्हणजे झालें. मग तीं नवीं नसलीं तरी चिंता नाहीं.

---

धडा ३८.

## सकाळ, संध्याकाळ, आणि दिशा.

सूर्य उगवण्याची वेळ तीस सकाळ म्हणतात; आणि सूर्य मावळण्याची वेळ तीस संध्याकाळ म्हणतात. तो सकाळीं उगवतो तेव्हां कोठें असतो? पूर्वेस असतो. तो संध्याकाळीं मावळतो तेव्हां कोठें असतो? पश्चिमेस असतो.

आपण पूर्वेकडे तोंड केलें म्हणजे आपल्या पाठीकडे पश्चिम असते, उजव्या हाताकडे दक्षिण असते, आणि डाव्या हाताकडे उत्तर असते.

पूर्व, पश्चिम, दक्षिण, आणि उत्तर ह्या चार मुख्य दिशा आहेत. ह्या चार दिशा समजल्या म्हणजे नकाशा पाहण्यास फार सोपें पडतें. हिंदुस्थानाच्या नकाशांत पुणें पाहा; त्याच्या पूर्वेस हैदराबाद आहे, पश्चिमेस मुंबई आहे, दक्षिणेस सातारा आहे, आणि उत्तरेस नगर आहे असें दिसेल.

ह्या दिशा समजल्या म्हणजे वारा कोणत्या दिशेस वाहतो, त्या दिशेचें नांव घेऊन सांगतां येतें, कापूस किंवा दुसरा कांहीं हलका पदार्थ वाऱ्यावर फेंकून दिला, तर ज्या दिशेस वारा वाहत असतो त्या दिशेस


तो पदार्थ जातो, ह्यावरून वारा कोणत्या दिशेस वाहत आहे हें समजतें.

आतां ह्या वेळेस पहा, सूर्य पश्चिमेस आहे. तो लवकर दिसेनासा होईल. आपल्या खालच्या आंगास, म्हणजे भूगोलाच्या दुसऱ्या बाजूवर, जे लोक आहेत त्यांस आतां उजाडेल. पहा, सूर्य खालीं चालला, आतां तर अगदींच दिसेनासा झाला. आतां तो उद्यां सकाळीं पूर्वेस उगवेल तेव्हां दिसेल; तोंपर्यंत कांहीं दिसणार नाहीं.

---

## धडा ३९.

## चोर आणि कुत्रा.



कोणीएका मनुष्याचें घर फोडावें म्हणून रात्रीस चोर

आला; त्यास पाहून दारीं कुत्रा होता तो त्याच्या आंगावर भुंकूं लागला तेव्हां चोरानें भाकरीचा तुकडा त्याच्या आंगावर टाकिला. तो न घेऊन कुत्रा त्यास म्हणतो, रे, पहिल्यानें मला संशय मात्र झाला होता कीं, इतक्या रात्रीस येथें आला आहेस म्हणून तूं कोणी वाईट मनुष्य असशील; परंतु त्वां लांच दिला, आतां तें खचीत झालें. तर मी दारापाशीं राहून आपल्या धन्याचें घर राखीत असतों; म्हणून तूं ह्या घराच्या आशींपाशीं आहेस तोंपर्यंत मी असाच भुंकेन, ह्यांत संशय धरूं नको. आपल्या वाटेनें जा कसा.

## तात्पर्य.

कार्यवादू आहेत ते मूर्ख किंवा लोभी ह्यांस लांच देऊन वश करितात; परंतु जे थोर, प्रामाणिक व इमानी आहेत, ते लांचानें वश होत नाहींत.

## धडा ४०.

## कविता.

### अभंग.

देव पाहतां असे एक ॥ मिथ्या बोलती अनेक ॥ १ ॥
लोची सर्वांतें निर्मितो ॥ रक्षोनियां लया नेतो ॥ २ ॥
चंद्र सूर्य पृथ्वी तारे ॥ निर्मिले हे त्याणें सारे ॥ ३ ॥

अन्न पाणी तोच देतो ॥ सान * थोरा संभाळितो ॥ ४ ॥
माता पिता बंधु खरा ॥ तोच सर्वांचा सोयरा ॥ ५ ॥

## दिंडी.

असा मायाळू अन्य कोण आहे ॥
कृपादृष्टी सर्वांस नित्य पाहे ॥
सर्वशक्ती सर्वेश सर्वसाक्षी ॥
सर्व कर्में वाईट बरीं लक्षी ॥

## श्लोक.


विद्यानसेज्यापुरुषासकांहीं ॥ विचारनीतितिळमात्रनाहीं ॥
तयानराकायअहोम्हणावें ॥ पशूमध्येंसत्यतयागणावें ॥१॥
उमाव्यावरीजेधवांसूर्यआला ॥ पळालीनिशाचंद्रनिस्तेजझाला ॥
प्रकाशामुळेंलोपल्यासर्वतारा ॥ मिळेनाकुठेंठावल्याअंधकारा ॥२॥
वृक्षावरीबैसुनियाप्रभातीं ॥ पक्षीपहामंजुळशब्दगाती ॥
स्वचंचुनेंपक्षहिशोधितातीं † ॥ चरावयालागिंउडोनिजाती ॥

---

* म्हणजे लहान. † म्हणजे स्वच्छ करितीं.

## धडा ४१.

# गरुडपक्षीण, मांजरी, आणि डुकरी.



एका गरुडपक्षिणीनें एका मोठ्या झाडाच्या खांदीवर घरकुंडा केला होता; एक जंगली मांजरी त्या झाडाच्या मध्यभागास ढोलींत राहत होती; आणि एक रानडुकरी, आपल्या पिल्यांसहवर्तमान, त्या झाडाच्या बुडीं पोकळींत वस्ती करून होती. जर त्या दोघींनीं त्या दुष्ट मांजरीची चहाडी ऐकिली नसती, तर तो शेजार त्यांस सुखकारक होऊन फार दिवस चालला असता. एके दिवशीं मांजरीनें असें केलें; ती प्रथम गरुड पक्षिणीपाशीं वर गेली, आणि तीस सांगूं लागली, शेजारणी बाई, काय सांगूं ? आपणांस

मोठी अनर्थाची वेळ आली आहे; ती द्वाड डुक-री रात्रंदिवस झाडाच्या बुडाशीं उकरीत असते; तिच्या मनांत कीं, झाड उलथून पडलें म्हणजे ह्यांचीं पिलें आपल्या हातीं सहजच लागतील. मी तर, बाई, आतां मला बरा मार्ग दिसेल तो करितें. तुझें तूं आपलें पहा. ह्याप्रमाणें गरुडपक्षिणीच्या मनांत भय उत्पन्न करून, तिला नकळतां हळूच ती मांजरी खालीं डुकरीजवळ आली; आणि खिन्न वदन करून म्हणाली, बाई, आज तुम्ही बाहेर तर जात नाहीं? डुकरी म्हणाली, असें कां पुसतेस? मांजरी म्हणते, नाहीं, सहज विचारिलें. तुमच्या मर्जीस येईल तसें करा; परंतु गरुडपक्षीण आज आपल्या पिलांस म्हणत होती कीं, डुकरी बाहेर गेली म्हणजे मी तुम्हांस तिचीं पिलें खाऊं घालीन, आणि एक मांजरीचेंही पिलूं खावयास देईन, हें तिचें बोलणें माझ्या कानीं पडलें. तर आतां मी येतें; माझीं मुलें एकटीं आहेत; मला त्यांस संभाळीत बसलें पाहिजे. असें म्हणून ती वर चढून आपल्या पिलांजवळ गेली; आणि त्यांस राखीत बसली. ह्याप्रमाणें तिनें कित्येक दिवसपर्यंत केलें. खावयास पाहिजे तें तिनें रात्रीस चोरून बाहेर जाऊन आणावें; दिवसास पिलें राखीत बसून

खालवर भीतीच्या मुद्रेनें पाहत असावें. ह्याप्रमाणें तिचें चरित पाहून, गरुडपक्षीण आणि डुकरी ह्यांच्या मनांत परस्परांवर पक्का द्वेष बाणला. मग त्या एकमेकींच्या भयानें जागा सोडून कोठें गेल्या नाहींत. शेवटीं त्यांचा असा परिणाम झाला कीं, त्या व त्यांचीं बाळकें अन्नावांचून मृत्यु पावलीं; आणि त्या मांजरीची धण झाली.

## तात्पर्य.

चहाडांनीं ह्या जगांत थोर थोर अनर्थ केले आहेत, कितीकां भल्या कुटुंबांच्यामध्यें द्वेष पाडिला आहे, तो शेवटपर्यंत मिटलाच नाहीं. कितीकांच्या मनांत विकल्प घातले आहेत, ते निघालेच नाहींत. कितीक धुळीस मिळविले आहेत, ते पुन्हा वर आलेच नाहींत. जो पुरुष शेजारधर्मानें वागावें असें इच्छितो, त्यानें कोणाच्या नुसत्या सांगण्यावरून आपल्या शेजाऱ्याविषयीं मनांत वांकडें आणूं नये; ऐकीव गोष्टीवर कल्पना करून आपलें मत दुसऱ्यापाशीं बोलूं नये; कां कीं आपण ज्यापाशीं बोलतों त्यास जर चहाडी करावयाची आहे तर तो भुगीचा हत्ती करील. जो पुरुष भला आहे त्याजवळ कोणी कोणाचें कसेंही सांगो, तो सर्व पोटांत सांठवून ठेवितो; एकाचें दुसऱ्यापाशीं

सांगत नाहीं, त्याचें फळ हेंच होतें कीं ते दोघे त्याजवर सारखी प्रीति करितात; ते शत्रु असले तर समयीं त्याच्या द्वारें मित्र होतात. तेणेंकरून त्या पुरुषाचें मन किती समाधान पावत असेल बरें ?

---

## धडा ४२.

### म्हणी.

अभ्यास करील त्याची विद्या, जपेल त्याची लक्ष्मी. खपेल त्याचें शेत, मारील त्याची तरवार, भजेल त्याचा ईश्वर.

खिळ्यासाठीं नाल गेला; नालासाठीं घोडा गेला; घोड्यासाठीं स्वार गेला; इतका अनर्थ खिळ्यानें झाला.

आदायापेक्षां ज्याचा खर्च मोठा, त्याचा होईल सदा तोटा.

पैसा टाकुनियां संतापा, विकत घेऊं नको त्रापा.

पुढल्यास ठेंच, मागला शहाणा.

कर्जाचे पाठीवरी, बसते असत्याची स्वारी.

शहाण्यास मार शब्दाचा, आणि मूर्खास टोणप्याचा.

सांचलेलें पाणी, किती दिवस देईल धणी.

लिहितां हातवळा, गातां गळा, आणि रांधितां मळा.

## धडा ४३.

# जिराफ.



### आर्या.

॥ ग्रीवा पायाचि असती ॥ उंटासम परि न उंट हा अन्य ॥
॥ जीराफ यास म्हणती ॥ ग्राम्य नव्हे हा पशू असे वन्य ॥१॥

जिराफ हा आफ्रिका खंडांत मात्र असतो. ह्याचा आकार लांबट असून सरळ असतो, आणि ह्याच्या कातडीवर चमत्कारिक ठिबके असतात. हा इतके

त्वरेनें चालतो कीं ह्याजबरोबर घोडाही धांवूं शकत नाहीं. ह्याचा स्वभाव गरीब, भितरा, आणि थंडा आहे. ह्याच्या जातीचा पशु मुंबई येथें पूर्वी आणिलेला होता.

---

धडा ९४.

## कविता.

### आर्या.

माता पिता धनी गुरु, ह्यांची आज्ञा सदैव मानावी ॥
पितरें जन्म धनी धन, देती विद्या गुरू अखंड नवी ॥ १ ॥
जोंवरि आहे तुमचें, मन कोमल तोंवरी शिका विद्या ॥
जून मनीं नशिरे तो, ग्रासील तुम्हांस कीं मग अविद्या॥ २ ॥
दुष्कर्माचा लोकीं, घडतो परिणाम फार वाईट ॥
ह्याकारितां त्यापासुनि, दूर रहावेंचि हें दिसे नीट ॥ ३ ॥

### अभंग दोन चरणी.


सत्य सर्वदा बोलावें ॥ खोटें सर्वदा टाकावें ॥ १ ॥
सत्य ईश्वरा आवडे ॥ सत्यें सर्व सिद्धि जोडे ॥ २ ॥
असत्याशीं करी द्वेष ॥ जोडा सत्य अहर्निश ॥ ३ ॥
भांडूं नये बालकानीं ॥ द्वेष धरूं नये मनीं ॥ ४ ॥
उणें कोणा बोलूं नये ॥ शिव्या कोणा देऊं नये ॥ ५ ॥
शिव्या देतां पाप घडे ॥ कोणासही तें नावडे ॥ ६ ॥
भलेपणें जे वागती ॥ त्यांची लोक कीर्ति गाती ॥ ७ ॥

### आर्या मोरोपंती.

ज्ञाता तूं दाता तूं, त्राता तूं वीर धीर भर्ता तूं ॥
जनपीडाहर्ता तूं, परमेशा मुख्य विश्वकर्ता तूं ॥ १ ॥
मातेतें त्यजुनि पळाहि, जाय न भलतीकडे जसें बाळ ॥
सत्संगाति सोडुनि मन, नच जाउ तसेंच घेउ हे आळ ॥ २ ॥

## धडा ४९.

## गाय.



### साखी.

|| गाय वनांतुनि पुच्छ उभारुनि येतां वत्सा सुचवी ||
|| धांवत धांवत हंबरतांतीं चाटुनी बाळा सुखवी || १ ||

गाय हें जनावर बहुधा सर्व देशांत आहे. हिला लोक बरीं बाळगितात. गाईचा स्वभाव फार गरीब आहे, आणि ही गवतावर पोट भरून आपणांस दूध देते. दुधापासून दहीं, ताक, लोणी, तूप, खवा, असे अनेक मधुर पदार्थ होतात. गाईच्या पोरास वांसरूं म्हणतात. त्यांत पुरुष जातीस पाडा व स्त्री जातीस पाडी अशीं कोठें नांवें आहेत. हाच मोठा पाडा असला म्हणजे त्यास बैल असें म्हणतात. आणि मग त्यास लोक नांगर, गाड्या, मोटा, व रहाट ओढण्यास आणि गोण्या व पखाली वाहण्यास लावितात.

धडा ४६.

## रबर.

हा पदार्थ पूर्वी आपल्या लोकांस माहीत नव्हता, परंतु अलीकडे पुष्कळांस ठाऊक झाला आहे. रबर कशाचा होतो हें कितीएकांस मुळींच माहीत नाहीं. व कांहीं लोक उग्याच खोटया कल्पना करितात. वास्तविक म्हटलें तर कांहीं झाडांच्या चिकापासून हा पदार्थ होतो. हा मऊ असतो. ह्याचा रंग मळकट काळा आहे, व ह्यास वास अफूसारखा कडू येतो. लांकडी पेनसलीनें लिहिलेलें रबरानें पुसिलें असतां जातें. हा फार चिवट आहे, एकाएकीं तुटत नाहीं. ह्याच्या आंगीं असा एक गुण आहे कीं हा पुष्कळ ताणिला असतां ताणिला जातो, आणि सोडिला म्हणजे पुन्हा जशाचा तसा होतो. ह्यांतून पाणी जात नाहीं. आपल्या लोकांस ह्याचा फारसा उपयोग माहीत नाहीं; परंतु साहेब लोकांत पुष्कळ कामांकडे ह्याचा उपयोग करितात.

---

धडा ४७.

## कांच.

गलास, हंड्या, भिंगें, बांगडया हे सर्व पदार्थ कांचेचे

आहेत. कांचेचे आणखीही पुष्कळ पदार्थ असतात. हे सर्व पदार्थ ओतींव असतात. कांच ज्या पदार्थांची करितात त्यांचा पहिल्यानें रस करून मग पदार्थ ओतितात. कांच अगदीं गुळगुळीत असते. ज्या पदार्थांची कांच होते त्यांतून पलीकडचा पदार्थ दिसत नाहीं, तरी कांचेंतून पलीकडचा पदार्थ दिसतो, व कांच जितकी अधिक स्वच्छ असेल तितका तो अधिक स्पष्ट दिसतो. कांचेचीं भांडीं फार स्वच्छ असतात; व कितीएक फारच सुंदर असतात. ह्या भांड्यांत कोणताही पदार्थ ठेविला तरी तो कळंकत नाहीं. आपल्या लोकांत कांचेचीं भांडीं बहुतकरून नसतात, पण साहेब लोकांत पुष्कळ असतात. भिंगाच्या मागें पारा व कथील लावलें म्हणजे आरसा होतो. कितीएक लोक नुसतीं भिंगेंच तसबिरीवर लावतात. कांच फार ढिसुळ असते; कांचेचा पदार्थ एकदां फुटला म्हणजे तो चांगला जडला जात नाहीं. मुलांनो, अब्रू ही कांचेसारखी आहे, कांचेचें भांडें एकदां फुटलें म्हणजे जसें नीट होत नाहीं, तसा तिला एकदां डाग लागला म्हणजे तो जात नाहीं.

## धडा ४८.

## पोपट.




हें चित्र पोपटाचें आहे, पोपट हें फार देखणें पांखरूं आहे. ह्याचा रंग बहुतकरून हिरवा असतो. ह्याचा पिसारा फार सुंदर असतो. बहुतकरून उष्ण देशांत पोपट असतात; थंड देशांत नसतात. ह्या हिंदुस्थान देशांत तर पोपट पुष्कळ आहेत. ते कळप करून फिरतात. ते झाडांच्या ढोल्यांत किंवा उंच भिंतीच्या भोंकांत आपलीं घरटीं करितात. आणि त्यांत आपलीं आंडीं घालितात. पुष्कळ लोक पोपट धरून पिंजऱ्यांत पाळितात. पोपटास बोलावयास शिकविलें असतां त्यास बोलतां येतें. पण जितके शब्द शिकवावे तितके शब्द मात्र तो बोलतो. तो जे शब्द बोलतो त्यांचा अर्थ त्याला समजत नाहीं. पोपटाचे पाय झाडाची डहाळी धरावयाच्या सोईचे केले आहेत. त्याच्या

पायास दोन बोटें पुढें व दोन बोटें मागें अशीं असतात. दुसऱ्या पांखरांच्या पायांस तीन बोटें पुढें व एक बोट मागें अशीं असतात. पोपटाची चोंच वांकडी असून बळकट असते, आणि तिच्या शेवटास धार असते. ह्यामुळें कंवटीचीं फळें त्याला सहज फोडितां येतात. पोपटाचें खाणें म्हटलें म्हणजे झाडांचीं फळें आणि शेतांतलि बीजें आहे. कांहीं मुलें पोपटांसारखीं असतात, म्हणजे तीं आपले धडे तोंडपाठ करितात, पण त्यांचा अर्थ त्यांस समजत नाहीं. अशा विद्येला पोपटविद्या म्हणतात. तर मुलांनो, तुम्ही पोपटांसारखे होऊं नका.

---

धडा ४९.

## कोंबडा.



हें चित्र कोंबड्याचें आहे. ह्या पांखराचे आंगीं

धीटपणा, वळकटी, आणि देखणेपणा हे गुण मोठे आहेत. ह्याच्या डोक्यावर तांबडी शेंडी असते, आणि चोंचेखालीं दोन कल्ले असतात. ह्याची चोंच फार मजबूद असते, ह्याच्या पायाच्या आंतल्या बाजूस एकेक नखी असते. त्या नखीनें हा दुसऱ्या कोंबड्यास मारितो. ह्याला दुसऱ्या कोंबड्याबरोबर झुंझण्याची फार हौस असते. ह्याच्या शेपटाचीं पिसें वर उभारलेलीं असतात तेव्हां सुंदर दिसतात. तीं तांबडीं, हिरवीं, आणि मिळीं असतात. हीं पिसें लोंबतात तेव्हां कमानीसारखीं दिसतात. मोठ्या पहांटेस कोंबडा शब्द करितो, त्या शब्दास कोंबड्याची आरवणी म्हणतात. त्याची आरवणी ऐकून उद्योगी लोक उठतात. हें पांखरूं पुष्कळ लोक पाळितात. ह्याची सागुती व आंडीं पुष्कळ लोक खातात. कोंबडीची आपल्या पिलांवर ममता फार असते. घार किंवा दुसरें मोठें पांखरूं दृष्टीस पडलें तर पिलांस आपल्या पंखाखालीं झांकून घेते.

## धडा ५०.

# सुसर.



हें चित्र सुसरीचें आहे. हें जनावर भयंकर आहे. हें बहुतकरून पाण्यांत राहतें, तरी कधीं कधीं जमिनीवरही असतें. ह्याच्या आंगावर खवले असतात. ते दाट असून इतके कठीण असतात कीं बंदुकीच्या गोळीनेंही न फुटतां गोळी माघारी उलटते; त्या खवल्यांचा रंग एकसारखा नसतो. पाठीवरल्या खवल्यांचा रंग भुरा असतो, आणि पोटावर आहेत त्यांचा रंग पिंवळा असतो. सुसरीचें डोकें लांबट असतें व तोंड पसरट असतें. सुसरीची जीभ लहान असते. तिचीं जाभाडें मोठीं बळकट असतात. तिला सुमारें साठ दांत आहेत असें म्हणतात. तिला चार पाय असतात. पुढल्या पायाला पांच पांच

आणि मागल्या पायांला चार चार बोटें असतात. त्या बोटांला बळकट नखें असतात. तिचें शेपूट लांब असतें.

सुसरीला लवकर धांवतां येतें. ती हमेषा नीट समोर धांवते. म्हणून तिजपासून पळून तिला चुकवावयाचें असलें तर वळणें घेऊन पळावें.


सुसर नदीच्या कांठीं वाळवंटांत ऐशींपासून शंभर पर्यंत आंडीं घालिते. तीं आंडीं उन्हानें उबून त्यांतून पिलें निघतात.

कोठें कोठें सुसरीच्या पोटाचें आणि शेपटाचें मास लोक काढून खातात. हें जनावर हिंदुस्थान, चीन, मिसर देश, आणि कांहीं दुसरे देश ह्यांत असतें.

---

## धडा ९१.

## शहामृग.



हें चित्र शहामृगाचें आहे. हें पांखरूं सर्व पांखरांत

मोठें आहे. हें घोड्यावर बसलेल्या स्वाराच्या डोक्या-बरोबर उंच असतें. हें पांखरूं आफ्रिका खंडाच्या उष्ण प्रदेशांत असतें. ह्याचे पाय लांब असून त्यांवर खवले असतात. ह्याच्या पायांला दोन बोटें असतात. तीं पुढच्या आंगासच असतात. हीं पांखरें कधीं कळप करून उडतात, तेव्हां दुरून पाहाणाऱ्यांस तुर्कस्वारांच्या पलटणीप्रमाणें दिसतात. ह्यांचीं पिसें फार सुंदर दिसतात. कितीएक देशांत श्रीमंत लोक ह्या पिसांचीं भूषणें करितात. ह्या पिसांकरितां शहामृगांची पारध बहुत लोक करितात. शहामृगाला जमिनीवरून फार लवकर धांवतां येतें. तो घोड्यापेक्षां देखील जलद धांवतो. हें पांखरूं फार मूर्ख, फार क्रूर, आणि फार विसराळू आहे असें म्हणतात. थोडक्याशा भयानें ह्याची मादी आपलीं आंडीं किंवा पिलें टाकून पळून जाते; तिला फिरून परत येण्याचें स्मरण राहत नाहीं.

ह्या पांखराच्या मूर्खपणाविषयीं असें सांगतात कीं, कोणी पारधी ह्याच्या पाठीस लागल्यामुळें जर हें थकलें, तर आपलें डोकें वाळवेंत किंवा झुडपाच्या पाल्यांत खुपसतें. मग त्याला वाटतें कीं, आतां मी कोणास दिसणार नाहीं. शहामृग हा कैंस, गवत, दगड, लोखंड, किंवा जें मिळेल तें खातो. अरब लोक म्हणतात कीं शहामृग कधीं पाणी पीत नाहीं,

शहामृगाचीं आंडीं नारळायेवढीं मोठीं असतात. तीं ह्या देशांत बहुत ठिकाणीं, शोभेसाठीं टांगून ठेवितात.

## धडा ५२.

### बुलबुल पक्षी आणि सोनकिडा.

#### आर्या.

बुलबुलनामक पक्षी, एक दिनीं फार वेळ गाऊन ॥
तोषवि पौरजनाला, गोड लकेऱ्या बहूत दावून ॥१॥
जरि अस्तमान होउनि, गेला आणीक रात्रही आली ॥
तरि नाहीं विश्रांती, मंजुळ लकिरीमधें किमपि झाली ॥२॥

#### श्लोक.

असें गातां गातां सहज जठराग्नी खवळला ॥
मिळावें भक्षाया म्हणउनि पहायास वळला ॥
तृणामध्यें तेथें अवचित किडा जो चमकला ॥
तयाला पाहूनी बुलबुल मनीं तो हरखला ॥३॥

#### अभंग.

अंधेरांत त्याची । चकाकी पाहूनी ॥
सोनकीडा मानी । मनीं त्यास ॥ ४ ॥

### आर्या.

तेव्हां खालीं उतरुनि, जावें त्याचा करावया घास ॥
ऐसें आणुनि चित्तीं, बुलबुल गेला धरावया त्यास ॥५॥

### श्लोक.

असा जाणुनी भाव त्या कीटकानें ॥
बहू पाटवोक्ती करोनी तयानें ॥
महा युक्तिनें तोषवीलें तयासी ॥
त्वरें आपुला जीव रक्षावयासी ॥६॥

### आर्या.

आतां त्या वक्त्याचें, भाषण किति मृदु सुयुक्त तें पाहा ॥
तो निश्चयें करीलचि, ज्याच्या कानीं पडेल तें आहा ॥७॥

### श्लोक.

बहुत सुरस तुझ्या ऐकुनी गायनाला ॥
बहुत नवल होतें माझिया वा मनाला ॥
वद मज तुजलाही पाहुनी दीपका या ॥
नवल बहुत झालें नाहीं का पक्षि राया ॥८॥

### आर्या.

तरि माराया मजला, चित्त तुझें थरथरांच कांपेल ॥
भंगाया गान तुझें, मन माझेंही तसेंच तापेल ॥९॥

### आर्या.

ज्या प्रभुनें तुजला ही, गायनशक्ती दिली पहा गाया ॥
त्यच प्रभुनें मजला, शक्ति दिली वा असें प्रकाशाया॥१०॥

## आर्या.

तरि तूं अपुल्या गानें, आणिक मी आपुल्या प्रकाशानें ॥
तोषवुनी भूषवुनी, घालवूं रात्री समग्र हर्षानें ॥ ११ ॥
ऐसें सुंदर भाषण, ऐकुनि तो त्यासि सोडिता झाला ॥
मारुनि चार लकेऱ्या, वाऱ्हेच्या भक्ष्यशोधना गेला ॥१२॥

---

## धडा ५२.

## वाचणें.

चांगलें वाचतां येणें ही गोष्ट फार अगत्याची आहे. ह्या गोष्टीकडे मुळापासून लक्ष दिलें नाहीं तर एखादी वाईट संवय लागते, आणि एकदां लागली ह्मणजे ती लवकर जात नाहीं. चांगलें वाचतां थोड्याच मुलांस येतें. कितीएक वाचतांना इतकी घाई करितात कीं तीं काय वाचतात हें त्यांचें त्यांस देखील समजत नाहीं; कितीएक पुरता उच्चार करीत नाहींत; कितीएक भलत्याच जागीं थांबतात; कितीएक तोच तो शब्द पुन्हा पुन्हा उच्चारितात, आणि कितीएक तर गाण्याच्या सुरावर वाचतात, असे पुष्कळ प्रकार आहेत. चांगलें वाचतां यावें ह्याकरितां पहिल्यापासूनच लक्ष दिलें पाहिजे. ऱ्हस्व, दीर्घ, अनुस्वार, आणि

विसर्ग ह्यांजकडे लक्ष देऊन ज्या शब्दांवर जोर द्यावयाचा त्यांजवरच द्यावा, भलत्यावर देऊं नये. प्रत्येक शब्द स्पष्ट उच्चारावा, आणि सावकाश वाचून दुसऱ्यास चांगलें ऐकूं जाईल असें वाचावें; व गळ्यावर न वाचतां एरव्हीं आपण बोलतों तसें वाचावें. जेथें ( , ) अशी खूण असेल तेथें अमळ थांबावें. जेथें ( ; ) अशी खूण असेल तेथें त्याहून जास्ती थांबावें. आणि ( . ) अशी खूण असेल तेथें पुष्कळ थांबावें. पहिल्या खुणेस स्वल्पविराम म्हणतात, दुसरीस अर्धविराम, आणि तिसरीस पूर्णविराम म्हणतात.

समाप्त.